# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

**सहा.अभि./ 7441/(घकव्य)पी/दक्षिण दिनांक 10/10/2025**

# <u>सूचना</u>

**विषय**: पी/दक्षिण विभागातील यांत्रिक झाडूच्या रोडवरील "रस्ते स्वच्छता योजना" या योजनेअंतर्गत दैनंदिन साफसफाई करण्याकरीता 02 अशासकीय संस्थांची नेमणूक करणेबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की, पी/दक्षिण विभागातील यांत्रिक झाडूच्या रोडवरील "रस्ते स्वच्छता योजना" या योजनेअंतर्गत दैनंदिन साफसफाई करणे या कामाकरीता कामगाराचा पुरवठा करण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण ह्यांच्या कार्यालयात रु.1452/- अधिक 18% जीएसटी रोखीने दि. 11 ऑक्टोबर , 2025 ते दि. 15 ऑक्टोबर, 2025 रोजी सकाळी 11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत विकत मिळतील. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण ह्यांच्या कार्यालयात दि.16ऑक्टोबर, 2025 रोजी सकाळी 11:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 02 संस्थांची दि. 17 ऑक्टोबर, 2025 रोजी दुपारी 12:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास / खजिनदार पैकी कोणत्याही एकास उपस्थित रहाणे **बंधनकारक** असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/-

**सहा.अभि.(घकव्य)पी/दक्षिण**